

# बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना


| प्रा. नितीन गवळी | प्रा. समिक्षा आचरेकर | प्रा. प्रियांका माळवदे |
|---|---|---|
| सहाय्यक प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापिका | सहाय्यक प्राध्यापिका |
| उद्यानविद्या विभाग | कृषि अर्थशास्त्र विभाग | मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग |

उद्यानविद्या महाविद्यालय, सरळगाव, ठाणे


कृषि क्षेत्राकरिता केंद्र आणि राज्य सरकार अनेक कृषी संलग्न योजना राबवत असतात. परंतु काही योजनांची संपूर्ण माहिती शेतकऱ्यांना मिळत नाही आणि ते सदर योजनेच्या उपभोगापासून अलिप्त राहतात. अशाच प्रकारची सरकार योजित एक सिंचन योजना आदिवासी भागातील शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरत आहे आणि ठरणार आहे. त्या संदर्भातील माहिती शेतकऱ्यांना सविस्तरपणे माहित असणे आवश्यक आहे.

अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी सन १९९३-९४ पासून राबविण्यात येत असलेली आदिवासी उपयोजना बदलेल्या परिस्थितीची गरज विचारात घेवून पिकांसाठी सिंचन सुविधा निर्माण करण्यासाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या नावाने सन २०१७-१८ पासून राबिवण्यात येत आहे.

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत) ही योजना ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपुर, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या १६ जिल्ह्यात योजना राबिवण्यात येते.

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्राबाहेरील) हि योजना ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या २९ जिल्ह्यात योजना राबविण्यात येते.

१. नवीन विहीर पॅकेज: नवीन विहीर, वीजजोडणी, आकार, सुक्ष्मसिंचन संच, पंपसंच, पीव्हीसी पाईप, परसबाग व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग

२. जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज: जुनी विहीर दुरूस्ती, वीजजोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, पंपसंच, पीव्हीसी पाईप, परसबाग व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग

३. शेततळयाचे प्लास्टिक अस्तरीकरण पॅकेज: शेततळयाचे प्लास्टिक अस्तरीकरण, वीजजोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, पंपसंच, परसबाग.

ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच शासकीय योजनेतून विहीर घेतली असेल किंवा स्वखर्चाने विहीर बांधली असेल अशा शेतकऱ्यांना वीजजोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, पंपसंच, पीव्हीसी पाईप, परसबाग यासाठी अनुदान देय राहील.

**सोलर पंपासाठी अनुदान:** जर शेतकऱ्यास महावितरण कंपनीकडून सोलर पंप मंजूर झाला असेल तर पंप संच व वीजजोडणी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु.३०००० /-) लाभार्थी हिस्याची रक्कम महावितरण कंपनीस अदा करता येईल.

सदर योजनेंतर्गत नवीन विहीर खोदनेसह अन्य सर्व बाबींची एकत्रितपणे अंमलबजावणी करणाऱ्या लाभार्थ्यांना कमाल २ वर्षांचा कालावधी अनुज्ञेय राहील. नवीन विहीर खोदण्याव्यतिरिक्त अन्य बाबींकरिता निवडलेल्या लाभार्थींना चालू व आर्थिक वर्षात संबंधित बाबींची अंमलबजावणी पूर्ण करणे आवश्यक राहील.

सदर योजने अंतर्गत खालील घटकासाठी त्यापुढे नमूद रक्कमेच्या मर्यादेत अनुदान देण्यात येते.

| अ. क्र. | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| १ | नवीन विहीर | २५००००/- |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | ५००००/- |
| ३ | ईनवेल बोअरिंग | २००००/- |
| ४ | परसबाग | ५००/- |
| ५ | वीज जोडणी आकार | १००००/- |
| ६ | पंपसंच | २००००/- |
| ७ | पाईप | ३००००/- |
| ८ | शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण | १०००००/- |
| ९ | सूक्ष्म सिंचन संच | ठिबक- ५००००/-<br>तुषार- २५०००/- |

**लाभार्थी पात्रतेच्या अटी:**

१) लाभार्थी हा अनुसूचित जमातीचा शेतकरी असला पाहिजे.

२) शेतकऱ्याकडे सक्षम प्रधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

३) शेतकऱ्याकडे त्याच्या स्वत:चे नावे किमान ०.४० हेक्टर व नवीन विहिरी खोदणे हि बाब वगळून योजनेतील अन्य बाबीसाठी किमान अन्य ०.२० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. आणि योजनेंतर्गत सर्व बाबींसाठी कमाल क्षेत्र मर्यादा ६.०० हे. पेक्षा कमी धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्र जमीन ०.४० हे. इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास

त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. त्याप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ६.०० हेक्टर धारण क्षेत्राची अट लागू असणार नाही.

४) लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे.

५) परंपरागत वन निवाशी (वन अधिकार मान्यता) अधिनियम, २००६ नुसार वन पट्टेधारक शेतकऱ्यांची या योजनेंतर्गत प्राधान्याने लाभार्थी म्हणून निवड करण्यात येईल व त्यानंतरच अन्य शेतकऱ्यांची लाभार्थी म्हणून निवड करण्यात येईल.

६) अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १५००००/- पेक्षा जास्त नसावे.

७) ज्या शेतकऱ्यांचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १५००००/- चे मर्यादेत आहे, अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसीलदार यांच्याकडून सन २०२०-२१ चे उत्पन्नाचा दाखला घेणे व अर्जासोबत सदर करणे आवश्यक राहील.

**घटक अंमलबजावणी:**

१) नवीन विहीर: नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने यापूर्वी केंद्र / राज्य / जिल्हा परिषद निधीतून नवीन सिंचन विहिरीचा लाभ घेतलेला नसावा. तसेच यापूर्वी शासकीय योजनेतून घेतलेल्या व अर्धवट राहिलेल्या अपूर्ण विहिरीचे काम करण्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही. नवीन विहीर घ्यावयाच्या स्थळापासून ५०० फुटाचे अंतरामध्ये दुसरी विहीर नसावी. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांच्याकडील पाणी उप्लब्धेतेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

२) जुनी विहीर दुरुस्ती: जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती/ नवबौध्द शेतकऱ्यांचा ७/१२ वर विहिरींची नोंद असावी. विहिरीच्या कामास उच्चतम अनुदान मर्यादेपेक्षा (रु. ५००००/-) अधिक रक्कम लागल्यास लाभार्थीने स्वत: उभी करावयाची आहे.

३) ईनवेल बोअरिंग: नवीन विहीर / जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने ईनवेल बोअरिंगची मागणी केल्यास रु. २०,०००/- च्या मर्यादित अनुदान अनुज्ञेय राहील. ईनवेल बोअरिंगचे काम करताना खर्चाचे अंदाजपत्रक व तांत्रिक निकषानुसार ठिकाणाची योग्यता भूजल सर्वेक्षण यंत्रणेकडून प्राप्त करून घ्यावा.

४) वीज जोडणी आकार: नवीन विहीर पॅकेज / जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज / शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण पॅकेजमधील तथा आवश्यकतेनुसार केवळ वीजजोडणी मागणी करणाऱ्या लाभार्थ्याने विद्युत वितरण कंपनीकडे कोटेशन भरल्याची पावती कृषी अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे सदर करावी. लाभार्थ्यांनी सादर केलेल्या पावतीनुसार विद्युत वितरण कंपनीकडे खातरजमा करून कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत लाभार्थ्याचा आधार संलग्न बँक खात्यात कृषी विकास अधिकारी यांनी इलेक्ट्रोनिक फंड ट्रान्स्फरद्वारे विहित अनुदान मर्यादेत अनुदान वर्ग करण्यात येईल.

५) पंपसंच: पंपसंचाच्या लाभासाठी निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांनी पंपसंच खरेदीकरिता कृषी विकास अधिकारी यांची पूर्वसमंती घ्यावी. लाभार्थ्यांनी एक महिन्याच्या कालावधीत पंपसंचाची खरेदी करणे आवश्यक राहील. अन्यथा शेतकऱ्यांची पूर्व संमती रद्द करण्यात येईल. केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम संस्थांनी पंपसंचाचे रीतसर तपासणी करून ते BIS अथवा अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार असल्याचे प्रमाणित केले असेल तर त्याच पंपसंचाची पूर्वसंमती प्राप्त लाभार्थी शेतकऱ्याने खरेदी करावयाची आहे.

६) पीव्हीसी पाईप: सिंचनासाठी मान्यताप्राप्त प्रकारच्या आय.एस.आय. मार्क पाईपची लाभार्थ्यांनी पूर्वसंमती त्यांच्या पसंतीनुसार खरेदी करावी. प्रति लाभार्थी एकूण लाभाची उच्चतम मर्यादा रु. ३०,०००/- राहील. पाईपची खरेदी केल्यानंतर त्याबाबतचे देयक लाभार्थ्याने कृषि अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे सादर करावे.

७) शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण: ज्या शेतकऱ्यास ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'मागेल त्याला शेततळे' या योजनेंतर्गत लाभ घेतलेल्या व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेता येईल.

८) सूक्ष्म सिंचन संच (ठिबक किंवा तुषार): सूक्ष्म सिंचनासाठी देण्यात येणारे अनुदान हे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजने अंतर्गत अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानास पूरक अनुदान म्हणून देण्यात येईल.

९) परसबाग: आदिवासी शेतकऱ्यांना कुटुंबासाठी लागणारा भाजीपाला त्यांचे घराभोवती पिकवणे शक्य आहे. यासाठी शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या प्रकारची भाजीपाला उदा. भेंडी, गवार, चवळी, दुधी भोपळा, डांगर भोपळा, शेवगा, काकडी, दोडका इ. बियाणांचे कीट लाभार्थ्यांनी महाबीज/एनएससी इत्यादी बियाणे उत्पादक कंपनीच्या अधिकृत परवानाधारक विक्रेत्याकडून खरेदी करण्यासाठी रु. ५००/- च्या मर्यादित अनुदान देय राहील.

**अर्ज व त्यावरील कार्यपद्धती:** सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी www.agriwell.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तसेच ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाची प्रत ग्रामसभेच्या शिफारशीने आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वसांक्षाकित छायांकित प्रतिसह कृषि अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे स्वहस्ते सादर करावा.

(संपर्क: +९१ ७५०७८६३८३६)

★ ★ ★